**<u>ठळक बातम्या</u>**

- पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं संरक्षण आणि त्याचा जबाबदारीनं वापर करण्यासाठी आपण सर्व वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- आर्थिक घोटाळ्याप्रकरणी उद्योगपती अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कमर्शियल फायनान्स कंपनीची सीबीआयकडून चौकशी

- इंडियन ओपन स्क्वॉश स्पर्धेत पुरुष गटात भारताचं विजेतेपद निश्चित/ महिला गटात अनाहत सिंगकडून पदकाची अपेक्षा

**आणि**

- मुंबई, ठाणे आणि कोकणाला आज उष्णतेचा यलो अलर्ट जारी

**<><><><><>**

पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं संरक्षण आणि त्याचा जबाबदारीनं वापर करण्यासाठी आपण सर्व वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पाणी जीवनाचा आधार असून पृथ्वीच्या भविष्याचा आकार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आंतरराष्ट्रीय जल दिनाच्या निमित्तानं दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्र संघानं देखील या निमित्तानं पाणी आणि लिंग समानता या अनुषंगानं 'जिथे पाणी वाहतं तिथं समानता वाढते' ही संकल्पना मांडली असून जल व्यवस्थापनातली महिलांची महत्वपूर्ण भूमिका आणि पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे त्यांच्यावर होणारा परिणाम तसंच त्याबाबतच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अधोरेखित केला आहे.

**<><><><><>**

निसर्गोपचार ही शाखा निसर्गाशी सुसंवाद राखायला प्रोत्साहन देते, असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. पुण्यात उरळी कांचन इथल्या निसर्गोपचार केंद्राच्या ८१व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते आज प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पारंपरिक भारतीय उपचार पद्धती सध्याच्या काळाशी अधिक समर्पक असल्याचं ते म्हणाले. औषधांवर असलेलं अवलंबित्व कमी करुन निसर्गाशी एकरुप होऊन निरोगी जीवनशैलीचा अंगीकार

करण्यासाठी निसर्गोपचार आपल्याला प्रेरणा देत असून पुण्यातल्या निसर्गोपचार केंद्रानं लोकांच्या निरोगी जीवनासाठी केलेलं कार्य उल्लेखनीय आहे, असं त्यांनी सांगितलं. योगाभ्यास, आयुर्वेद आणि निसर्गोपचार यांना आता जागतिक पातळीवर महत्त्व प्राप्त झालं आहे आणि भविष्यात ते कधीच कमी होणार नाही, असं ते म्हणाले. या कार्यक्रमाला राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश सिंग, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि इतर मान्यवर उपस्थित होते. प्रत्येकानं आपल्या दैनंदिन जीवनात निसर्गोपचाराचा अधिकाधिक वापर करावा असं आवाहन सुनेत्रा पवार यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

रशियाहून कच्चं तेल घेऊन येणारं ॲक्वा टायटन हे जहाज आज कर्नाटकात मंगळुरु इथल्या बंदरात पोहोचलं. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे जगभरात वाढलेल्या इंधनाच्या किमती स्थिर करण्याच्या उद्देशानं अमेरिकेनं समुद्रात उभ्या असलेल्या रशियाच्या तेलवाहू जहाजांना पुढे जाण्याची परवानगी दिल्यानंतर हे जहाज भारतात आलं आहे. याशिवाय अमेरिकेहून एलपीजी घेऊन येणारं एक मालवाहू जहाज देखील मंगळुरु इथं पोहोचलं आहे.

**<><><><><>**

सीबीआयनं कथित आर्थिक घोटाळा प्रकरणी सहभाग असल्याबद्दल अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कमर्शियल फायनान्स या कंपनीची चौकशी सुरु केली आहे. त्याअंतर्गत आज सीबीआयनं ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या सल्लागाराची चौकशी केली. या कंपनीनं रिलायन्स कमर्शियल फायनान्स आणि रिलायन्स होम फायनान्स या सध्या चौकशी सुरु असलेल्या दोन कंपन्यांची मालमत्ता खरेदी केली आहे, असं सीबीआयनं म्हटलं आहे. बँक ऑफ महाराष्ट्रनं गेल्या वर्षी यासंदर्भात तक्रार दाखल केली होती.

याशिवाय सीबीआयनं हजारो कोटी रुपयांच्या एका मोठ्या बँक घोटाळा प्रकरणात रिलायन्स एडीए ग्रुपच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी केली. स्टेट बँक ऑफ इंडियानं केलेल्या तक्रारीनंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला होत.

**<><><><><>**

केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी उद्या महत्त्वपूर्ण आणि सामरिक खनिजांच्या ब्लॉक्स्च्या लिलावाची सातवी फेरी सुरू करतील. सातव्या टप्प्यात, विविध राज्यांमध्ये खाणपट्टा आणि संमिश्र परवान्या अंतर्गत १९ ब्लॉक्स उपलब्ध करून दिले

जातील. या गटात खनिजांचा वैविध्यपूर्ण संच समाविष्ट असून, तो स्वच्छ ऊर्जा, प्रगत तंत्रज्ञान, खतं आणि धोरणात्मक उद्योग, यासारख्या क्षेत्रांसाठी आवश्यक आहे. लिलाव प्रक्रिया ऑनलाईन माध्यमातून पार पडेल आणि यात पारदर्शकता राहील असं खाण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

इंडियन ओपन २०२६ स्क्वॉश स्पर्धेत पुरुष गटात भारताच्या अभय सिंग आणि वीर चोत्रानी यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आज मुंबईत होणाऱ्या अंतिम सामन्यात या दोघांमध्ये विजेतेपदासाठी लढत होणार असून भारताचं पदक निश्चित झालं आहे. महिला गटात भारताच्या अनाहत सिंग हिचा सामना आज संध्याकाळी इजिप्तच्या हाना मोताझ हिच्याशी होईल. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात अनाहतने भारताच्याच तन्वी खन्ना हिचा ३-१ ने पराभव केला होता.

<><><><><>

भारतीय शेतकरी हे ऊर्जा आणि इंधन निर्मिती करण्यासाठी सक्षम झाले आहेत, असं केंद्रीय नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत एका कार्यक्रमात ते बोलत होते. इंडियन ऑईल आणि भारत सरकार मिळून एक लाख लिटर इथेनॉल, दीडशे टन बाय बिटुमन आणि ७८ हजार टन विमानाचं इंधन तयार करत असल्याचं त्यांनी सांगितलं. बायटेक्नॉलॉजीचा वापर केल्यामुळे डिझेलच्या आयातीवरचं अवलंबित्व कमी होईल अस ते म्हणाले.

<><><><><>

राष्ट्रीय आणि राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानूसार अकोला जिल्ह्यातली सर्व दिवाणी आणि फौजदारी न्यायालयं, तसंच कामगार न्यायालय, सहकार न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, औद्योगिक न्यायालय आणि जिल्हा ग्राहक तकार आयोग यांच्या विद्यमानं राष्ट्रीय लोकअदालतीचं नुकतंच आयोजन करण्यात आलं होतं. या माध्यमातून ८ हजार ३३७ प्रकरणं निकाली काढण्यात आली आहेत.

<><><><><>

एपस्टिन फाईल प्रकरणी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी उद्या संयुक्तपणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपूरमधल्या मुख्यालयावर मोर्चा काढणार आहे. नागपुरातल्या

संविधान चौक ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघणार आहे.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यातल्या तीनही महसूल उपविभागांतील १०९ वाळू घाटांविरुद्ध राष्ट्रीय हरित लवादाकडं दाखल करण्यात आलेली याचिका २० मार्च रोजी निकाली काढण्यात आली. त्यामुळं आता सर्व घाटांवर वाळू उत्खननाला सुरुवात झाली आहे.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातून जाणाऱ्या सुरत-अमरावती महामार्गावर पानबारा सरई नदीच्या पुलावर आज बोलेरो पलटून झालेल्या अपघातात ८ जण जखमी झाले. जखमी झालेले सर्वजण धुळ्यात साक्री इथले रहिवासी असून ते कामाच्या शोधासाठी गुजरातमध्ये बडोदा इथं जात होते. वाटेत या वाहनात तांत्रिक अडचण निर्माण होऊन चालकाचा ताबा सुटला आणि अपघात झाला. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

महसूल गुप्तचर संचालनालयानं काल नवी मुंबईत न्हावा शेवा बंदरावर केलेल्या कारवाईत प्रतिबंध घालण्यात आलेले 'वॉकी-टॉकी' संच आणि वापरलेल्या 'हार्ड डिस्क ड्राइव्ह्ज' जप्त केल्या. या वस्तूंची एकूण किंमत ९ कोटी २५ लाखापेक्षा जास्त असल्याचं संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितलं. या प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली. जप्त करण्यात आलेले वॉकी-टॉकी परवानगी देण्यात आलेल्या क्षेत्राबाहेर कार्यरत राहू शकतात, आणि ते राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करू शकतात. त्यामुळे दूरसंचार विभागानं त्याचा समावेश काळ्या यादीत केला आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात वाडा परिसरात मुसारणे इथं एका कंपनीच्या बांधकामात अडथळा आणल्या प्रकरणी पालघर जिल्हा पोलिसांनी काल १५ जणांविरोधात गुन्हा दाखल केला. आरोपींनी मजुरांना धमकावल्याचा आणि काम सुरु ठेवण्यासाठी कंत्राटदाराकडून पैशाची मागणी केल्याचा आरोप आहे.

**<><><><><>**

नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यातल्या धानोरा इथं पोलिसांनी धाड टाकून ४ लाख ७२ हजार रुपये किमतीचा गुटख्याचा साठा जप्त केला आहे. यावेळी पोलिसांनी केलेल्या कारवाईत ९ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कारवाई दरम्यान एका बोलेरो वाहनात पोलिसांना विविध प्रकारचे तंबाखू मिळाले असून या प्रकरणी दोघांविरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

हवामान विभागानं मुंबई, ठाणे, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्याला आज आणि उद्या तर सिंधुदुर्ग जिल्ह्याला आज उष्णतेचा यलो अलर्ट जारी केला आहे. या काळात हवामान उष्ण आणि दमट राहील असं विभागानं कळवलं आहे. तर विभागानं सातारा, सांगली, सोलापूर, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांना उद्यासाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला असून याभागात उद्या तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची आणि हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वारा येण्याची शक्यता देखील वर्तवली आहे.

**//<><><><><>//**